# नवी मुंबई महानगरपालिका
# एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी
# राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग, एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी मध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात काम करण्यासाठी पात्र इच्छुक उमेदवारांची निव्वळ तातपुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने खालील नमुद पदांसाठी दिनांक 12/07/2023 रोजी थेट मुलाखत (Walk in interview) आयोजित करण्यात आली आहे.

| पदनाम | अर्हता | रिक्त पदे | मासिक ठोक मानधन |
|---|---|---|---|
| वैदयकीय अधिकारी (पूर्णवेळ) | • मान्यता प्राप्त विदयापीठाची एम.बी.बी.एस. पदवी.<br>• महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी बंधनकारक.<br>• शासकीय / स्थानिक संस्था/ट्रस्ट/खाजगी यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव आवश्यक | 1 अजा, 1 अज, 1 विजा (अ), 1 इमाव, 1 ईडब्लुसी, 1 अराखीव | 60,000/- |
| मायक्रोबायोलॉजिस्ट | • एम.डी मायक्रोबायलॉजिस्ट | 1 अराखीव | 75,000/- |
| इपिडेमोलॉजिस्ट | • Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | 1 अराखीव | 35,000/- |

**अटी व शर्ती**

1) वयोमर्यादा :- उच्चतम वयोमर्यादा 70 वर्ष
2) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा आणि त्याने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे आवश्यक राहील.
3) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्तीचा कालावधी हा 6 महिने करीता असेल.
4) उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदापत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रांच्या छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.
5) उमेदवारांनी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत स्व-साक्षांकित (self attested) प्रत जोडणे आवश्यक राहील.
6) उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.
7) उमेदवाराचे नाव बदलले असेल तर नाव बदलसाठी उमेदवाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्रातील प्रत सादर करावी. उमेदवार मुळ नावाने (Maiden Name) देखील अर्ज करु शकतात.
8) जाहिरातीमधील विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या स्व-साक्षांकित (self attested) प्रती नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.
9) मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

10) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतानाआढळल्यास त्याची उमदेवारी रद्द केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

11) अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

12) निवड झालेल्या उमदेवारांची नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल.

13) उमेदवारास कामाचा राजीनामा द्यावयावा असल्यास त्याने त्यासंदर्भात 30 दिवसांची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

14) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशिल देणे आवश्यक आहे.

15) निवड झालेल्या उमेदवारांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल.

16) भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे, पदांची संख्या बदल करणे, परीक्षा/भरतीची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे व अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष, एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, नवी मुंबई महानगरपालिका यांना असतील.

17) उक्त रिक्त पदे नवी मुंबई महानगरपालिका नियमित आस्थापनेवरील नसून निवड करण्यात आलेल्या उमेदवारास नमुंमपा आस्थापनावर नियमित करुन घेण्याचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.

**विशेष सुचना :-**

1. यापूर्वी सादर केलेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
2. कोणताही अर्ज पोस्टाद्वारे/टपालाद्वारे स्वीकारले जाणार नाहीत.
3. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी मूळ अंतिम वर्षाची गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रासह इतर सर्व आवश्यक प्रमाणपत्रे व त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रती, स्वत:चे पासपोर्ट आकाराच्या फोटोसह उपस्थित रहावे.
4. उमेदवाराने कामाच्या अनुभवाची मुळ प्रमाणपत्रे त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे.
5. मुलाखतीचे ठिकाण :- आरोग्य विभाग, तिसरा मजला, नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, प्लॉट क्रमांक1/2, पामबीच रोड, से.15 ए, सीबीडी बेलापूर
6. उमेदवारांच्या थेट मुलाखती हया दिनांक 12/07/2023 रोजी घेण्यात येतील. सकाळी 10.00 ते दुपारी 2.00 या वेळेत उमेदवारांची नोंदणी आणि मुळ कागदपत्रे छाननी व तपासणी करण्यात येईल आणि सायंकाळी 3.00 ते 5.00 या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी**
**नवी मुंबई महानगरपालिका**